# पंडित जवाहरलाल नेहरुंच्या पूर्व काळातील कृषी धोरण

**सौ. उषादेवी अंकुश कांबळे**, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रस्तावना

भारताच्या इतिहासात महात्मा गांधीनंतर डॉ. आंबेडकरांसोबत भारतावरच नव्हे तर संपूर्ण जगावर आपल्या समाजवादी दृष्टीकोनाचा प्रभाव टाकणारे राजकीय व्यक्तीमत्व म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरु स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या भारतीय राजकारणावर नेहरुंच्या असणाऱ्या प्रभावामुळे जागतिक राजकारणात नेहरुंचे विचार हेच भारताचे विचार मानले जायचे. त्यांच्या आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनाबरोबरच जवाहरलाल नेहरुंना एका अशा भारतीय समाजाची संकल्पना होती ज्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर पिढयानपिढयाची गरिबी संपून किंवा कमी होऊन जागतिक नकाशात प्रगतीचा मानदंड बनेल. यासाठीच त्यांनी औद्योगिक प्रगतीसोबत भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत टेनेन्सी व्हॅलीच्या धर्तीवर भारतात कृषीसाठी हिराकुड—भाक्रा नानगलसारखे मोठे मोठे प्रकल्प हाती घेऊन भारताच्या प्रगतीस दिशा दाखवण्याचे काम केले आहे.

## जवाहरलाल नेहरु यांचा जीवनकाल

भारताच्या स्वातंत्र्य लढयातील अग्रणी आणि राष्ट्रीय सभेच्या स्थापनेतील महत्वाचे नाव असलेले मोतीलाल नेहरु यांचे जवाहरलाल नेहरु चिरंजीव होते. जवाहरलाल यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला. इंग्लंडला बॅरिस्टरची पदवी घेऊन १९१२ मध्ये भारतात आले असले तरी १९२० च्या असहकार आंदोलनामुळे जवाहरलाल आणि म. गांधी निकट संपर्कात आले. यानंतरच्या संपूर्ण स्वातंत्र्य चळवळीत पंडित नेहरुंनी नऊ वर्षाच्या नऊ वेळा कारावासात जावे लागले.

सन १९२३ मध्ये त्यांची नियुक्ती काँग्रेसच्या महासचिवपदी करण्यात आली. त्यांच्या गुणविशेषांमुळे सन १९२३, १९३९, १९४६, १९५१ ते १९५४ साली काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले. १९४६ मधील अंतरिम सरकारमध्ये ते प्रधानमंत्री होते आणि १९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथम पंतप्रधान होण्याचा बहुमान मिळाला. प्रधानमंत्री पदावर ते १९४७ पासून १९६४ पर्यंत म्हणजे आपल्या मृत्यूपर्यंत विराजमान होते.

राजकीय दृष्टीकोनातून नेहरु गांधीजींचे शिष्य होते. भारतीय राजकारणात नेहरु गांधीजींचे राजकीय उत्तराधिकारी मानले जात होते. गांधीजी प्रमाणेच नेहरुंचा अहिंसेवर विश्वास होता.

संपूर्ण मानवजातीच्या दृष्टीकोनातून जवाहरलाल नेहरुंना राष्ट्रवाद ही संकल्पना फारच छोटी वाटत होती. त्यांनी वेळोवेळी पायदळी तुडवत असलेल्या मानवतेसाठी साम्राज्यवादाला आणि वसाहतवादाला जोरकस विरोध केला. आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडातील उदारवादी चळवळींना त्यांचा पाठिंबा होता. अहिंसा आणि शांततेवर श्रध्दा असल्याने ते संयुक्त राष्ट्रसंघाचे समर्थक होते. सुवेझ कालवा, कोरिया, कांगो, व्हिएतनाम, अरब—इस्त्राएल संघर्ष अशा अनेक प्रकरणात प्रसंगी मध्यस्थ होऊन नेहरुंनी शांततेच्या पुनर्निर्मितीसाठी प्रयत्न केले.

आर्थिक दृष्टीकोनातून पाहता नेहरु हे समाजवादी विचारसरणीचे होते. यातूनच पहिल्या काही पंचवार्षिक योजनांवर त्याचा प्रभाव दिसून येतो. १९३९ च्या काँग्रेस पुरस्कृत राष्ट्रीय योजना समितीचे ते अध्यक्ष होते. स्वातंत्र्यानंतर ही ते राष्ट्रीय योजना आयोगाचे मुख्य होते.

जवाहरलाल नेहरु जरी समाजवादी विचारसरणीचे असले तरी आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाचे समर्थक होते म्हणूनच भारताच्या प्रगतीसाठी कृषीसोबत अनेक औद्योगिक विकासाला पंचवार्षिक योजनेत स्थान देऊन त्यांनी वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. भारताच्या वेगवेगळया भागात निर्माण झालेली औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन केंद्रे नेहरुंचा दूरदृष्टीपणा दर्शवितात.

नेहरुंनी कृषी क्षेत्रात ज्या सुधारणा केल्या त्या समजून घेण्यासाठी नेहरु पूर्व कृषी धोरणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## पूर्वमध्यकालीन कृषी धोरण

प्राचिन काळी ते अगदी मुघल शासन काळापर्यंत राजाच भूमीचा मालक समजला जात होता. महसूल व्यवस्थेवरुन असे लक्षात येते की भूराजस्व १/६ ते १/४ भाग पध्दतीने होते. अमरकोशात १२ प्रकारच्या भूमीचा उल्लेख आहे. जसे उर्वरा (सुपीक), असर (नापीक), मरु (रेतीयुक्त),
देवमातृक (वर्षाधारीत), पकिल (दलदल) इ. भूमीकराचे संग्रहण करण्यासाठी ध्रुवाधिकरण आणि करणिक अशा स्वरुपाचे प्रशासकीय अधिकारी होते.

नेहरुपूर्व काळापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता असे ध्यानात येते की, या काळातील कृषीच भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार होती. निवर्तन, पाटका, नड, कृत्यावाप, द्रोणवाप, आढवाप इ. भूमीमापनाचे एकक होते. वाराह मिहिर याने आपल्या बृहत्संहिता या पुस्तकात पाऊस संभावना व अभाव तसेच वातावरण

संबंधी भविष्यवाणी केल्या आहेत. या सर्व काळातील शासकांनी आपल्या परीने सिंचन व्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न केले आहेत. गुप्त काळात अरघट्ट (रहाट) या सिंचन साधनाचे तर व्हेन त्सांग सिंचनासाठी घटी यंत्र (रहाट) चे वर्णन करतो. राहिल्यसागर, कीरतसागर (चंदेल) भोगसागर (परमार) आदि सिंचन तलावाचे उल्लेख येतात.

या काळातील मोठा बदल म्हणजे सामंतवाद जो या कृषी क्षेत्रावर आधारित निर्माण झाला. सैनिक सेवेच्या बदल्यात जहागिरी प्रदान करणे किंवा वरच्या शक्तीला काही शुल्क देऊन स्वत:चे क्षेत्र (Feud) प्राप्त करणे म्हणजे सामंवाद, शासकवर्ग आणि मध्यस्थ सामंतांची जमिनीवर अधिकार बनवण्याची वाढती मागणी यामुळे शेतकऱ्यांकडून जमीनीचे हळूहळू हस्तांतरण सामंताकडे होऊ लागले. यामुळे शेतकऱ्यांची स्थिती पट्टेदार, जातेदार अशी झाली. कराचा वाढता बोझा यामुळे शेतकऱ्यांकडून जबरदस्ती धान्य वसुली केले जावू लागले. याप्रकारे आर्थिक शोषण आणि दमनाची नव्या रुपाची सुरुवात झाली.

ब्रम्हदेय, अग्रहार वस्त्या, मंदिर, अधिकारी यांना दिलेल्या भूमी अनुदानामुळे भूमीच्या मोठया क्षेत्रावर शेती सुरु झाली. पडीक जमिनीचे कृषी जमिनीत रुपांतर झाले. जंगले साफ करुन कृषी क्षेत्र वाढविले गेले. यामुळे मध्यभारत, ओडिशा, पुर्वी बंगालमध्ये कृषी उत्पादन वाढले व मोठया लोकसंख्येचे यामुळे पोषण शक्य झाले.

काही ठिकाणी नविन तंत्रज्ञान, सिंचन, बियाणे व अन्य वित्तीय आधार देवून त्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारली गेली. आदिवासी क्षेत्रात ब्राम्हण संस्कृतीचा प्रसार झाला. त्यांच्यात लिपी, कला, शिक्षणाचा प्रसार होऊन सामाजिक एकिकरण झाले. आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली.

परंतु यामुळे मध्यमवर्गाची संख्या वाढली. शासकांचा प्रजेशी संपर्क संपुष्टात आला. सामंत, कुलीन, भूमीपती, पट्टेदार, जोतदार अशी साखळी तयार झाली. भूमीचे तुकडे पडत गेले. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दयनीय होत गेली. त्यामुळे राजस्वक्षय होत गेला.

**मुघलकालीन कृषी धोरण**

या काळात राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेतसारा होते. शेरशाहकालीन भूराजस्व व्यवस्था पुढील मुघलकालीन भूराजस्व व्यवस्थेचा आधार झाली. ही भूराजस्व व्यवस्था रयतवारी पध्दतीची होती. ज्यामध्ये प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संबंध येत होता. काही भागात बहई तर काही भागात कानकूल व्यवस्था प्रचलित होती. शेरशाहने समस्त भूमीमापन बीघामध्ये 'गन—ए—सिकंदरी'च्या आधारे केले गेले. उत्पन्नाच्या आधारे कृषी जमीन उत्तम, मध्यम, निम्न अशा तीन वर्गात विभागली गेली. शेरशाहला शेतकऱ्यांप्रती सहानुभूती होती.

अकबराच्या काळात आणि नंतरही कृषी विकास आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. चौधरी, देशमुख, देशपांडे, इजारेदार, हजारेदार हे सुध्दा मध्यस्थ जमीनदार शेतसारा वसूलीचे राज्यतर्फे काम करत होते.

'आईन—ए—अकबरी' मध्ये खादयान्न आणि गैरखादयन्न पिकांच्या उत्पदनाविषयी लिहिले आहे. यामध्ये रब्बी हंगामाच्या १६ पिकांचा आणि खरीप हंगामाच्या पंचवीस पिकांचा शेतसारा दर यांचे वर्णन आहे. या काळातील मुख्य पिक तंबाखू होते. सोबत मका, गहू, तांदूळ, ऊस, कापूस, नीळ, कडधान्य, बाजरी, अफीम, शोरा, मसाले इ. पिके घेतली जात होती. भारतात तंबाखूची शेती पोर्तुगीजांनी सुरु केली. अकबरने सिंचन व्यवस्था सुधारली. विशेषत: यमुना कालव्याची दुरुस्ती केली. शिहाब नविन कालवा बांधला. शाहजहाने सिंचनासाठी ९८ मैल लांबीचा रावी कालवा ज्याला 'नहर—ए—फैज' असे म्हटले जाते. त्याची निर्मिती केली. भूमीमापनासाठी 'गज—ए—सिंकदरी' (३९ अंगुल) या सोबत बांबुच्या तुकडयाचे जरीब हे एकक (६० गज x ६० गज = १ बिघा) बनवले. नंतरच्या काळात सिंकदरी गजच्या ऐवजी 'इलाही गज' (४१ अगुल ३३ १ / २ इंच) चा प्रयोग केला. वर्गात वर्गीकरण केले. पोलाज (प्रतिवर्षी केली जाणारी शेती सर्वश्रेष्ठ भूमी) परती (एक वर्षाच्या अंतराने पीक घेणे) चाचर (दोन —तीन वर्षाच्या अंतराने पीक घेणे) आणि बंजर (जी जमीन पाच वर्षापेक्षा अधिक काळ मशागती खाली आली नाही. या काळातील शेतसारा प्रणाली जिरण 'जप्ती किंवा आईने दहसाला' असे म्हटले जाती ही प्रणाली तोडरमलने सुरु केली. ही व्यवस्था दहा वर्षासाठी होती. याला रयतवाडी प्रथा पण म्हणतात. मागील दहा वर्षाचे उत्पादन, कृषी उत्पादकाच्या किंमती, शेतीचे प्रत्यक्ष क्षेत्र या सूचनेवरुन एकत्रीकरण केले जात असे. ही व्यवस्था आठ प्रांतात—दिल्ली, आग्रा, लाहोर, बिहार, माळवा, अवध आणि बंगाल प्रांतात लागू होती. याशिवाय बटई, कानूकूत आणि नस्व यांचाही वापर होत होता. शिवाजी महाराजांच्या काळातही ही व्यवस्था बऱ्यापैकी चालू राहिली.

**ब्रिटिशकालीन कृषी धोरण**

इ.स. १६०० च्या दरम्यान भारतात आलेल्या ब्रिटिशांनी हळूहळू संपूर्ण भारतावर कब्जा केला. त्यांच्या रणनीतीचे भारतावर अत्यंत दुरगामी परिणाम झाले. ग्रामीण भारतावर ब्रिटिश रणनीतीचा पडलेला

महत्वाचा प्रभाव म्हणजे भारतीय कृषी व्यवस्थेत झालेले अमुलाग्र बदल नविन प्रशासकीय बदलांमुळे जुनी कृषी व्यवस्था आणि गावांची आत्मनिर्भरता सर्व कोलमडून पडली. रॉबर्ट क्लाईव्हच्या कायमधारा पध्दत, जमीनदारी पध्दत, नव्या भू धारणामुळे (Land-tenures) नवीन प्रकारचे भूमालक तयार झाले.

ब्रिटीशांना भारतातील आधीच्या शासकांप्रमाणे राज्य करायचे नव्हते त्यांना फक्त नफेखारी माहित होती. ज्या पिकांतून नफा मिळत असे त्याचेच पिक घेण्यास त्यांनी शेतकऱ्यांना भाग पाडले. उदा. कापूस, नीळ, अफीम, चहा इ. यातून तयार झालेला माल पडेल भावात खरेदी करुन परत तोच माल भारतीयांना अव्वाच्या सव्वा किंमतीने विकला जाई. ब्रिटिश काळात एकूण एकोणिस दुष्काळ पडले. परंतु ब्रिटिश सरकारने भारतीयांना विशेषतः शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. काही भागात तीव्र प्रकारची आंदोलने, चळवळी शेतकऱ्यांकडून झाल्याने बी–बियाणे खरेदी, पशू खरेदीसाठी रक्कम, विहिर खोदण्यासाठी सहाय्य अशा प्रकारची मदत (१९०१—मॅकडोनेल आयोग) थोडीफार प्रमाणात केली गेली. कर्झनकडून सिंचाई व्यवस्था, कृषी अधिकोष व दळणवळण इ. प्रकारचे सहाय्य कृषीसाठी देण्यात आले.

परंतु ब्रिटिश काळातील भूराजस्व पध्दतीमुळे नवे सामाजिक वर्ग निर्माण झाला. उदरनिर्वाहाची इतर कमी साधने असल्याने भूमीवरील बोझा वाढला आणि त्याची किंमतही वाढली. सरकारी कराचे प्रमाण आणि जमीनदारांच्या हिश्श्याचे प्रमाण जास्त असल्याने शेतकरी वर्ग सावकार आणि व्यापाऱ्यांच्या जाळयात अडकला. अनुपस्थित जमीनदार, मधला परजिवी वर्ग आणि लोभी सावकार त्यांनी शेतकऱ्यांना अधिकाधिक दारिद्रयात ढकलले. अशा पध्दतीने शेतकऱ्यांना परकिय आक्रमणासोबत स्वकीय शोषक आणि भांडवलदार त्यांनाही तोंड द्यावे लागले.

भूमी किरायात वाढ करणे, शेतीवरुन काढून टाकणे, सावकारांची व्याजखोरी हयाविरुध्द शेतकऱ्यांनी आवाज उठवला परंतु हा वर्ग तितकासा जागृत नसल्याने विसाव्या शतकात हयांच्या संघटना स्थापन होऊन भारतीय साम्यवादी पक्ष, कॉंग्रेस, समाजवादी पक्ष हयांच्या प्रभावाखाली आल्या. परंतु यातूनही अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही.

**आत्मनिर्भरतेचे लक्ष्य ( Self-Sufficiency Target)**

भारतात ज्या पध्दतीने वेळोवेळी शासन बदलले परंतु सर्वांच्या कृषी धोरणात जास्त बदल झालेला दिसत नाही. मुख्य कारण म्हणजे अनियमित पाऊस, वारंवार पडलेला दुष्काळ, कृषीचे पावसावर अवलंबन आणि महत्वाचे म्हणजे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष्य. हयातूनच १९४७ साली स्वातंत्र्यानंतर समस्येचे स्वरुप बदलले ते म्हणजे कमी कृषी क्षेत्र, अविकसीत तंत्रज्ञान आणि वाढती लोकसंख्या हे सर्व प्रश्न त्याकाळी १९४७ पर्यंत अस्तित्वात आले होते, ज्यातून भारतीयांना आत्मनिर्भर बनण्यावर विचार करण्यात आला.

**समारोप**

दूरदृष्टी असलेल्या नेहरुजींनी आत्मनिर्भर भारताची मुहर्तमेढ पहिल्या पंचवार्षिक योजनेत रचली आणि ही योजना हेरॉल्ड—डोमर यांच्या मदतीने कृषी विकासावर केंद्रीत करण्यात आली आणि त्यांच्या प्रयत्नांना बऱ्यापैकी यश आलेले दिसून येते. यानतंर प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कृषीसाठी धोरण राबवलेली आपणास दिसून येतात.

**संदर्भसूची**

१) आधुनिक भारताचा इतिहास— ग्रोवर आणि बेल्हेकर.

२) प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास — डॉ. संजय बिरादार